संक्षीप्त फौजदारी प्रकरण क्र. ४८०/२०२०
सरकार/योगेश
नि.क्र. १९ खाली

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र. १ याची साक्ष</u>**

**मी शपथेवर सांगते कि,**

**नाव – लताबाई रामेश्वर शेळके,**

**वय – ३८ वर्ष**

**धंदा – शेती,**

**रा. – बेलोणा, ता. नरखेड, जि.नागपूर**

**<u>सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता श्री. जी.बी. राऊत यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>.**

१) फिर्यादी माझी मुलगी आहे. मी आरोपीला ओळखते. घटना साधारणतः ४ ते ५ वर्षांपुर्वी दुपारी २ वाजता घडली. घटनेच्यादिवशी मी घरी असताना माझ्या भाच्याने मला घरी येवून सांगितले की, आरोपी फिर्यादीला त्याच्यासोबत लग्न कर नाहीतर तुझा चेहरा खराब करेन असे म्हणत होता. त्यामुळे आरोपीविरूध्द फिर्याद देण्यासाठी आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिल्यानंतर आरोपी गावातून पळून गेला. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. मी आरोपीला ओळखते तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदार सरकारीपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी वकिलांनी उलटतपासणीच्या स्वरूपातील सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली ती त्यांना देण्यात आली.**

२) हे म्हणने खरे आहे की, दि. १३.१०.२०२० रोजी दुपारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान मी काटोलला तेरवी करता गेली होती. माझे पती ग्रामपंचायतीच्या कामाावर गेले होते. माझी मुलगी घरी एकटीच होती. हे म्हणने खरे आहे की, त्यावेळी आरोपी दारू पेवून माझ्या घरी आला व त्याने फिर्यादीला म्हटले की तुझ्या घरचे लोक कोठे गेले. हे म्हणने खरे आहे की, फिर्यादीने आरोपीला घरात कोणी नाही, तु बाहेर निघून जा असे म्हटल्यावर आरोपीने फिर्यादीला हेपरे, मादरचोद, भोसडे तु जास्त माजली का अशी शिवीगाळ केली आणि खंडारेच्या घराजवळच्या रस्तयावर सुध्दा आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली. हे म्हणने खरे आहे की, तू कोणाला सांगितले तर मी पाहून घेईन अशी आरोपीने फिर्यादीला धमकी दिली. हे म्हणने खरे आहे की, खंडारेची बाई आल्यावर तो तेथून पळून गेला असे फिर्यादीने मला फोनवरून सांगितले.

**उलटतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. एम. आर. चरडे यांच्या मार्फत सूरे.**

३) हे म्हणणे खरे आहे की, घटना मी स्वतः प्रत्यक्ष पाहिलेली नाही. मी त्यावेळी घटनास्थळी हजर नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, परिच्छेद क्र. २ मधील सर्व मजकूर मला माझ्या पतीने सांगितला. पोलिसांनी मला माझे बयाण वाचून दाखवले नव्हते. घटनेवेळी आरोपीने माझ्या मुलीला त्याच्यासोबत लग्न कर नाही तर तुझा चेहरा खराब करून टाकीन अशी धमकी दिल्याचे मी

पोलिसांना बयाण देताना सांगितले होते, मात्र तसा मजकूर पोलिसांनी का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने फिर्यादीला त्याच्याशी लग्न कर अन्यथा तुझा चेहरा खराब करून टाकेन अशी धमकी दिल्याचे असे माझे नोंदवलेले बयाण पोलिसांनी दोषारोप पत्रामध्ये जोडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला माझ्या पतीने फोन करून सांगितले की, घटनेवेळी मुलगी धनश्री घरामध्ये कपडे धूत होती.

४) आरोपीचे घर माझ्या घरापासून दोन घरे सोडून पुढे आहे. आरोपीचे लग्न झाले नाही. आरोपीच्या घरी त्याचे आई–वडील, भाऊ, भावची पत्नी व मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनेपुर्वी माझे व आरोपीच्या कुटूंबियांमध्ये बोलणे होते. घटनेनंतर आरोपीसोबत आमचे बोलणे बंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत आमचा जुना वाद असल्यामुळे माझ्या मुलीने आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेदिवशी आरोपीने माझ्या मुलीला अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला टी.बीचा आजार असल्यामुळे तो घरी झोपून असायचा. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला खोटया गुन्हयात फसवण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

**(श्रीमती वृषाली दी.सुंगारे)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक १५.०३.२०२५.**

**समक्ष**

**(श्रीमती वृषाली दी.सुंगारे)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक १५.०३.२०२५.**

संक्षीप्त फौजदारी प्रकरण क्र. ४८०/२०२०
सरकार/योगेश
नि.क्र. ९ खाली

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र. २ याची साक्ष</u>**

**मी शपथेवर सांगतो कि,**

**नाव – रामेश्वर गणपत शेळके,**

**वय – ५१ वर्ष**

**धंदा – नोकरी,**

**रा. – बेलोणा, ता. नरखेड, जि.नागपूर**

**<u>सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता श्री. जी.बी. राऊत यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>.**

१) फिर्यादी माझी मुलगी आहे. मी आरोपीला ओळखतो. घटना साधारणतः ४ वर्षांपुर्वी दुपारी घडली होती. घटनेच्यादिवशी मी ग्रामपंचायतीमध्ये कामाला गेलो होतो. मला माझ्या मुलीने फोनकरून सांगितले की, आरोपी मला रस्त्याने येता–जाता त्रास देतो व धमकी देतो. त्यामुळे मी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदार सरकारीपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी वकिलांनी उलटतपासणीच्या स्वरूपातील सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली ती त्यांना देण्यात आली.**

२) हे म्हणने खरे आहे की, दि. १३.१०.२०२० रोजी दुपारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान मी ग्रामपंचायतीमधे कामाला गेलो होतो व माझी पत्नी तेरवीच्या कार्यक्रमासाठी काटोलला गेली होती. हे म्हणने खरे आहे की, दुपारी ३ वाजता मी जेवण करण्यासाठी घरी आलो होतो. हे म्हणने खरे आहे की, त्यावेळी फिर्यादीने मला सांगितले की, आरोपी दारू पिवून आमच्या घरी आला व त्याने फिर्यादीला तुमच्या घरातील कोठे गेले असे विचारले. हे म्हणने खरे आहे की, आरोपीला घरात कोणी नाही, तु बाहेर निघून जा असे म्हटल्यावर आरोपीने फिर्यादीला हेपरे, मादरचोद, भोसडे तु जास्त माजली का अशी शिवीगाळ केल्याचे फिर्यादीने मला सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, तसेच आरोपीने फिर्यादीला याबाबत कोणला सांगितले तर तुला पाहून घेईल अशी धमकी दिल्याचे देखील मला सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनेबाबत गावच्या सरपंचांना सांगितले. त्यानंतर पुन्हा संध्याकाळी ६ वाजता आरोपीने माझ्या मुलीला शिवीगाळ केली. त्यामुळे माझ्या मुलीने आरोपीविरूध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. एम. आर. चरडे यांच्या मार्फत सूरे.**

३) हे म्हणणे खरे आहे की, घटना मी स्वतः प्रत्यक्ष पाहिलेली नाही. मी त्यावेळी घटनास्थळी हजर नव्हतो. पोलिसांनी बयाण देताना मी असे सांगितले होते की, मी ग्रामपंचायतीच्या कामावर

गेलेलो असताना फिर्यादीने मला फोन करून सांगितले की, आरोपी तिला धमकी देतो तसेच शिवीगाळ करतो. हा सर्व मजकूर माझ्या बयाणात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. पोलिसांनी माझे बयाण पोलीस स्टेशनलाच घेतले होते. रिपोर्ट देण्यासाठी पोलीस स्टेशनला फिर्यादीसोबत मी व माझी पत्नी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेदिवशी आरोपीने फिर्यादिला अश्लील शिवीगाळ केल्याबाबत फिर्यादीनेच आम्हाला सांगितले. आम्ही स्वतः घटना प्रत्यक्ष पाहिली नाही. सदरची घटना गावातील इतर कोणी बघितली किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेदिवशी आरोपीने फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ करून तिला पाहूण घेण्याची धमकी दिल्याचे मला फिर्यादीने फोन करून सांगितल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे खोटे बयाण नोंदवलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेपुर्वी आमचे आरोपी व त्याच्या कुटूंबियांशी बोलणे होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आरोपीला टी.बी. झालेला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपीसोबत आम्हाला कोणतेही संबंध ठेवायचे नव्हते. त्यामुळे आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज आरोपीविरूध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

| | |
|---|---|
| **श्रवणोत्तर स्विकृत** | **समक्ष** |
| **(श्रीमती वृषाली दी.सुंगारे)** | **(श्रीमती वृषाली दी.सुंगारे)** |
| **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,** | **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,** |
| **नरखेड** | **नरखेड** |
| **दिनांक १५.०३.२०२५.** | **दिनांक १५.०३.२०२५.** |

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव– टी. एन. कांबळे (श्रेणी–३)**